# कृषी महाविद्यालय, धुळे

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

---

### डॉ. विलासजी खर्चे, मा. कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांची कृषी महाविद्यालय, धुळे येथे भेट




दिनांक २ एप्रिल २०२६ रोजी, मा. कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी कृषी महाविद्यालय, धुळे येथे भेट दिली.

या भेटी साठी आयोजित सत्कार समारंभात माननीय कुलगुरूंचा पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कृषी महाविद्यालयाचे मा. सहयोगी अधिष्ठाता, डॉ. बी. एम. इल्हे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली. तसेच विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष व पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक, डॉ. राहुल देसले यांनी कृषी महाविद्यालयाची सविस्तर माहिती पॉवरपॉइंट सादरीकरणाद्वारे प्रस्तुत केली.

सदर भेटीदरम्यान त्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेट देऊन तेथील शैक्षणिक व कृषी संशोधन उपक्रम, कामकाज, सुविधा व प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक विभागातील सुरू असलेल्या उपक्रमांबाबत माहिती घेतली तसेच भविष्यातील सुधारणा व विकासासाठी आवश्यक सूचना दिल्या. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील कृषी हवामान दर्शविणारे स्क्रीनचे उद्घाटन केले. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना व संशोधकांना हवामानविषयक माहिती अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार असून कृषी व शिक्षणाला चालना




मिळणार आहे. तसेच, मा. कुलगुरूंनी महाविद्यालयातील विविध अडचणी व समस्या समजून घेतल्या व त्यावर आवश्यक त्या उपाययोजना सुचविल्या. विशेषतः कृषी संशोधनावर त्यांनी भर दिला.

मुलांच्या वसतिगृहाला त्यांनी विशेष भेट देऊन त्याची सध्याची परिस्थिती पाहणी केली. वसतिगृह जीर्ण अवस्थेत असल्यामुळे विद्यार्थ्यांना पर्यायी ठिकाणी स्थलांतर करण्याच्या प्रक्रियेचा आढावा घेतला व ती प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या. यानंतर त्यांनी मुलींच्या वसतिगृहालाही भेट देऊन तेथील सुविधा व सुरक्षिततेबाबत माहिती घेतली.

भेटीच्या शेवटी त्यांनी महाविद्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वय, जबाबदारी व कार्यक्षमता यांवर भर देण्याचे आवाहन केले.

सदर भेटीमुळे महाविद्यालयाच्या विकासासाठी नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.


कृषि महाविद्यालय धुळे
सभागृह


Redmi Note 10T 5G
02/05/2026 18:00


DEPARTMENT OF SOIL SCIENCE
मृदविज्ञान विभाग,कृ.म.धुळे.






You are under CCTV Surveillance.
Redmi Note 10T 5G


Redmi Note 10T 5G
02/05/2026 16:35


Redmi Note 10T 5G
02/05/2026 16:06


WELCOME
to
GOVERNMENT
COLLEGE OF AGRICULTURE
DHULE - 424 004
MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI
Redmi Note 10T 5G